| | |
|---|---|
| **MHKO200003552024** | **नियमित दिवाणी दावा क्र.६५/२०२४ मधील**<br>**निशाणी क्रमांक ५ खालील आदेश**<br>**आनंदा महादेव पाटील**<br>**विरुध्द**<br>**संपतराव सिताराम दिंडे** |

वादी यांनी सदरचा दावा कायम मनाई मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ व कलम १५१ अन्वये प्रस्तुत अर्जाद्वारे दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी असणा–या नावाचे नोंदीआधारे प्रतिवादी यांनी दावा मिळकत त्रयस्थ इसमास विक्री अगर तबदील करु नये, तसेच दावा मिळकतीमध्ये असणारे वादींचे शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी हरकत व अडथळा करु नये तसेच प्रतिवादी यांनी वादीस बेकायदेशीरपणे व अंगबळाचे जोरावर दावा मिळकती मधुन बेदखल करु नये म्हणुन प्रतिवादी विरुध्द दावेचे अंतिम निकालापावेतो तुर्तातुर्त मनाई ताकीद व्हावी अशी विंनती केली.

**<u>अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>** –

०३. <u>दावा मिळकतीचे वर्णन</u> – मौजे पडळ, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील पुढील प्रमाणे शेत मिळकती –

| **अ.क्रं.** | **भू.गट क्र.** | **जुना सर्व्हे नं.** | **एकुण क्षेत्र हे.आर.** | **आकार रु.पै.** |
|---|---|---|---|---|
| अ. | ३८८ | १६७ | ०.५३ | ६–५६ |
| ब. | ५५ | १२३ चा हिस्सा/फा.नं.२ | ०.२९ | ३–२५ |

येणेप्रमाणे संपूर्ण शेत मिळकती हया दाव्याचा विषय असुन त्यांना सोयीकरीता येथुन पुढे **"दावा मिळकत'**' संबोधणेत येत आहे.

०४. वादी यांचे असे कथन आहे की, दावा मिळकती हया मुळच्या सिताराम उर्फ बापू तुकाराम दिंडे यांचे नावे नोंद असणारी मिळकती होती. सिताराम मयत झालेनंतर दावा मिळकतींना प्रतिवादी यांचे नावाची नोंद दत्तक मुलगा या नात्याने झालेली असुन प्रतिवादी हे त्यांचे पूर्वहक्कदारांपासून कोल्हापूर येथील नमुद पत्यावर कायमस्वरुपी राहणेस असलेमुळे प्रतिवादींचे दावा मिळकतीमध्ये कधीही प्रत्यक्ष कब्जेवहिवाट नव्हती व नाही. दावा मिळकती ही पडळ गावी स्थित असलेने दावा मिळकतीमध्ये साधारणपणे १९४८ चे पूर्वीपासून वादींचे पूर्वहक्कदार महादेव उर्फ म्हादू बाबजी पाटील यांचीच प्रत्यक्षात साधे कुळ म्हणुन कब्जेवहिवाट होती. दावा मिळकतीमध्ये वादींचे पूर्वहक्कदार सालोसाल कष्ट मशागत करुन गवत, भात, ऊस अशी पिके घेऊन मिळकत उपभोगित आलेले होते व त्यांचे पश्चात वादी आजही उपभोगित आहेत. दावा मिळकतीमधून मिळणा–या पिकाचा खंड म्हणुन मुळ मालकास म्हणजेच प्रतिवादींचे पूर्वहक्कदार व प्रतिवादी यांना भात, गुळ, साखर व काही वेळेस रोख रक्कमेच्या स्वरुपात दिलेला आहे. परंतु, वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान साधारणपणे ७० वर्षाहुन अधिक काळाचे संबंध असलेने वादी यांना प्रतिवादी अगर त्यांचे पूर्वहक्कदार यांनी खंडाच्या पावत्या दिलेल्या नव्हत्या व नाहीत.

०५. वादी यांचे पुढे असे कथन आहे की, वादी यांचे पूर्वहक्कदार वडील महादेव उर्फ म्हादू बाबाजी पाटील हे दावा मिळकतीमध्ये कुळ असलेचे तसेच प्रत्यक्ष कब्जेवहिवाट असलेने दावा मिळकतींचे महसुल दप्तरी पिक पाहणी सदरी व कळ आणि खंड सदरी वादींचे पूर्वहक्कदार यांचेच नावाची नोंद सन १९४८ पासुन होती. परंतु, आलीकडील काळाल संगणकीय प्रत ७/१२ उता–यावरा पिक पाहणी च्या नावाची नोंद दिसू येते. तसेच दावा मिळकत (अ) चे ७/१२ पत्रकी इतर अधिकार रखान्यामध्ये वादींचे पूर्वहक्कदार म्हादू बाबजी पाटील यांचे नावाची नोंद आजही आहे. वादींचे पूर्वहक्कदार व प्रतिवदी यांचे दरम्यान यापूर्वी महसुल दप्तरी कुळ कायदयाचे

अनुषंगाने कामे देखील चाललेली होती. दावा मिळकतीमध्ये वादींची आजी प्रत्यक्ष कब्जेवहिवाट असुन दावा मिळकतीमध्ये सध्या वादींचे ऊस पिक आहे. प्रतिवादी हे त्यांचे संपुर्ण कुटूंबियासह कोल्हापूर येथे वास्तव्यास असलेने त्यांना दावा मिळकतीची सद्यपरिस्थिती माहिती नसताना केवळ ७/१२ पत्रकी असणा–या नावाचे नोंदी आधारे दावा मिळकत त्रयस्थ इसमास विक्री करणार असलेचे बोलुन दाखवित आहेत तसेच वादींचा कब्जा सोडणेबाबत वादींना धमकावले आहे अन्यथ बेदखल करणेची भाषा बोलुन दाखवली. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुतचा कायम मनाईचा अर्ज दाखल केला असुन दावेचा अंतिम निकालास बराचसा दिनावधी लागणार असलेमुळे दरम्यानचे काळात प्रतिवादींविरुध्द  तुर्तातुर्त मनाई मंजुर होणेची विनंती वादी यांनी केली.

०६. प्रतिवादी यांनी नि.क्र.१६ कडे दाव्यास कैफियत व तुर्तातुर्त मनाई अर्जास म्हणणे दाखल करुन हरकत नोंदवली आहे की, तुर्तातुर्त मनाई अर्जातील दावा मिळकतीचे सर्वसाधारण वर्णन, दावा मिळकत प्रतिवादी व त्यांचे पूर्वहक्कदार यांचे मालकीची आहे या बाबी वगळता तुर्तातुर्त मनाई अर्जामधील इतर मजकुर खोटा असुन त्यांना मान्य व कबुल नाही. प्रतिवादी यांचे असे म्हणणे आहे की, वादीने दाखल केला दावा स्पेसिफिक रिलीफ ॲक्टचे कलम ३८ नुसार चालणेस पात्र नाही कारण दावा दाखल तारखेस वादींचा दावा मिळकतीत कब्जे वहिवाट नव्हती अगर नाही अगर दावा मिळकतीशी कायेदशीर नाते असलेचा कोणताही कागदोपत्री पुरावा वादींनी दावेचे कामी दाखल  केलेला नाही. वादींनी दाव्या कामी चतु:सिमा नमुद केलेल्या नाहीत.  दावा मिळकतीला साधे कुळ म्हणुन म्हादू बाबाजी पाटील यांचे नावाची नोंद झालेली आहे ही बाब कागदोपत्री दिसत असली तरी सुरुवातीपासून दावा मिळकतीत प्रतिवादी व त्यांचे पूर्व हक्कदार त्याचप्रमाणे सध्या प्रतिवादींचा मुलगा स्वप्नील संपतराव दिंडे यांची प्रत्यक्ष कब्जेवहिवाट असुन त्यातील पिके सुध्दा

प्रतिवादी व त्यांचा मुलगा स्वप्नील यांनी केलेली आहेत. प्रतिवादींनी अगर त्यांचे पूर्वहक्कदारांनी वादींना दावा मिळकतीतुन मिळणा–या पिकाचा कोणताही प्रकारचा खंड अगर, गुळ, साखर व रोख रक्कमा दिलेल्या नव्हत्या अगर नाहीत. दावेच्या सरकारी कागदोपत्री झालेल्या पोकळ नोंदीचा गैरफायदा घेवुन वादींनी खोटया मजकुराच्या दाव्याची रचना केलेली आहे. वादी म्हणवतात ते वादींचे पूर्वहक्कदार म्हादू बाबजी पाटील हे हयात आहेत किंवा कसे याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा या कामी वादींनी दाखल केलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये वादींचे दाव्यास मुदतीच्या कायदयाची व स्पेसिफिक रिलीफ ॲक्ट मधील तरतुदींची बाधा येते. म्हादू बाबजी पाटील मयत झालेबाबतचा सविस्तर तपशील वादींनी देणेचे टाळले आहे. केवळ वादींच्या कथनांवरुन वादी व म्हादू बाबाजी पाटील यांचे कोणतेही नाते प्रस्थापित होत नाही. दावा मिळकतीशी कायदेशीर नाते असलेबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा या कामी वादींनी दाखल केलेला नसल्यामुळे वादींचा हक्क अगर अधिकार कायदेशिररित्या दिसुन येत नाही. दावा मिळकतीतील गट नं.३८८ मध्ये साधे कुळ म्हणून म्हादू बाबाजी पाटील अशी नोंद आहे व गट नं.५५ मध्ये इतर हक्कात कोणत्याही कुळाची नोंद नाही. प्रतिवादी हे कोल्हापूर येथे वास्तव्यास असले तरी त्यांची व त्यांचा मुलगा स्वप्नील यांची नियमित दावा मिळकतीमध्ये वहिवाट आहे. वादींचा दावा मिळकतीशी कोणताही कायदेशीर संबंध नाही. दावा मिळकतीत वादींची कब्जे वहिवाट नव्हती अगर नाही. वादींनी दावा मिळकत (अ) मधील ७/१२ पत्रकी इतर हक्कात असलेल्या म्हादू बाबाजी पाटील या पोकळ नोंदीचा गैरफायदा घेवुन प्रस्तुत खोटया दाव्याची रचना केलेली आहे. सबब,वादींचा तुर्तातुर्त अर्ज खर्चासह नामंजुर करणेची विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

**०७.** वादी व प्रतिवादींच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीचे कथन तसेच संचिकेत दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील प्रश्नबिंदू

विचारार्थ उपस्थित होतात. सदर प्रश्नबिंदूचे निष्कर्ष कारणमिमांसेह खालील प्रमाणे –

| अ.क्र. | प्रश्नबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीचे हक्कात प्रथमदर्शनी केस आहे काय ? | होकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय? | होकारार्थी |
| ३. | उक्त अर्ज नामंजूर केल्यास वादी चे अपरिमित नुकसान होईल काय ? | होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | **नि.क्र.५ तुर्तातुर्त मनाई अर्ज मंजुर करण्यात आला.** |

०८. वादीतर्फे दावा मिळकतीच्या संदर्भात नि.क्रं. ३ सोबत दाखल केलेले कागदपपत्रे खालील प्रमाणे–

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १. | पडळ येथील भू.गट नं.३८८ चा सन २०१७ ते २०२० चा ७/१२ उतारा | ०७.०८.२४ | डिजीटल प्रत |
| २. | पडळ येथील भू.गट नं.३८८ चा सन २००९ ते २०१५ चा ७/१२ उतारा | १९.११.१५ | स.शि.नक्कल |
| ३. | पडळ येथील भू.गट नं.३८८ चा सन १९९८ ते २००९ चा ७/१२ उतारा | ०९.०४.२१ | स.शि.नक्कल |
| ४. | पडळ येथील भू.गट नं.३८८ चा सन १९८८ ते १९९८ चा ७/१२ उतारा | ०९.०४.२१ | स.शि.नक्कल |
| ५. | पडळ येथील भू.गट नं.३८८ चा सन १९७१ ते १९८८ चा ७/१२ उतारा | ०९.०४.२१ | स.शि.नक्कल |
| ६. | पडळ येथील सर्व्हे नं.१६७ चा सन १९५९ ते १९६९ चा ७/१२ उतारा | ०९.०४.२१ | स.शि.नक्कल |
| ७. | पडळ येथील सर्व्हे नं.१६७ चा सन १९५८ ते १९६९ चा ७/१२ उतारा | ०९.०४.२१ | स.शि.नक्कल |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | पडळ येथील भू.गट नं.५५ चा सन २०१८ ते २०२१ चा ७/१२ उतारा | ०७.०८.२४ | डिजीटल प्रत |
| ९. | पडळ येथील भू.गट नं.५५ चा सन २००९ ते २०१५ चा ७/१२ उतारा | १९.११.१५ | स.शि.नक्कल |
| १०. | पडळ येथील भू.गट नं.५५ चा सन १९९८ ते २००९ चा ७/१२ उतारा | ०९.०४.२१ | स.शि.नक्कल |
| ११. | पडळ येथील भू.गट नं.५५ चा सन १९७१ ते १९८८ चा ७/१२ उतारा | ०९.०४.२१ | स.शि.नक्कल |
| १२. | पडळ येथील सर्व्हे नं.१२३ फा.नं.२ चा सन १९५९ ते १९७१ चा ७/१२ उतारा | ०९.०४.२१ | स.शि.नक्कल |
| १३. | पडळ येथील सर्व्हे नं.१२३ फा.नं.२ चा सन १९५८ ते १९७२ चा ७/१२ उतारा | ०९.०४.२१ | स.शि.नक्कल |

**०९.** प्रतिवादीतर्फे दावा मिळकतीच्या संदर्भात नि.क्रं.१४ सोबत दाखल केलेले कागदपत्रे खालील प्रमाणे–

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १. | वटमुखत्यारपत्र | ०१.१०.२४ | अस्सल |

**१०.** दोन्ही बाजुंच्या दस्तऐवजाचे अवलोकन करता दाव्यात विश्लेषीत केलेली छायाचित्रे ही भारतीय पुरावा कायदया अंतर्गत तरतुदीनुसार पुराव्यादरम्यान सिध्द होतील तत्पुर्वी ती प्रस्तुत अर्जासाठी विचारात घेण्यात येत नाहीत.

## का र ण मि मां सा

**प्रश्नबिंदू क्र.१ करिता** –

**११.** प्रस्तुत वादी हे तात्पुरता मनाई आदेश मिळण्यासाठी प्रथमदर्शनी केस त्यांच्या हक्कात आहे का हे सिध्द करतात का हे पाहणे महत्वाचे ठरते. प्रस्तुतचा दावा वादी यांनी कायम मनाई करीता दाखल केला असुन त्यामध्ये वादी यांनी नि.क्र.३ चे

वर्णन यादी सोबत पडळ येथील भू.गट क्र.३८८ चा सन २०१७ ते २०२०, सन २००९ ते २०१५, सन १९९८ ते २००९, सन १९८८ ते १९९८, सन १९७१ ते १९८८ असे ७/१२ उतारे दाखल केले असुन त्यामध्ये खाता क्र.१११४ अन्वये प्रतिवादी संपतराव दिंडे यांच्या नावाची नोंद असुन पिक पाहणी सदरी म्हादू बाबाजी पाटील यांची नोंद आहे. सदर दावा मिळकत ही भोगवटदार वर्ग–२ या सत्रातील असुन कब्जेदार म्हणुन प्रतिवादी संपतराव दिंडे यांचे नाव नमुद आहे. त्यानंतर वादी यांनी पडळ येथील सर्व्हे नं.१६७ चा सन १९५९ ते १९६९, सन १९५८ ते १९६९ चे ७/१२ उतारे दाखल केले असुन त्यामध्ये पिक पाहणी सदरी व कुळ आणी खंड रखाण्यात म्हादू बाबाजी पाटील यांच्या नावाची नोंद असल्याची बाब दिसुन येते. त्यानंतर वादी यांनी पडळ येथील भूमापन गट क्र.५५ चा सन २०१८ ते २०२१, सन २००९ ते २०१५, सन १९९८ ते २००९, सन १९७१ ते १९८८, सन १९५९ ते १९७१ त्याच बरोबर पडळ येथील गट नं.५५ चा जुना सर्व्हे नं.१२३ चा फा.नं.२ चा सन १९५९ ते १९७१ व १९५८ ते १९७२ असे ७/१२ उतारे अभिलेखावर दाखल केलेले आहेत.

**१२.** वादी यांचे पूर्वहक्कदार वडील महादेव उर्फ म्हादू बाबाजी पाटील हे दावा मिळकतीमध्ये कुळ असल्याचे तसेच दावा मिळकतीमध्ये वादीचे पूर्वहक्कदारांची प्रत्यक्ष कब्जेवहिवाट असलेने दावा मिळकतीच्या महसूल दप्तरी, पिक पाहणी सदरी व कुळ आणि खंड सदरी वादींचे पुर्वहक्कदार यांच्या नावाची नोंद १९४८ पासुन ते आजमीतीपर्यंत असल्याचे दिसुन येते. सध्या वादी यांनी दावा मिळकतीत ऊसाचे पिक घेतले आहे. त्यानंतर प्रतिवादी यांनी नि.क्र१४ चे वर्णन यादी सोबत दि.०१/१०/२०२४ रोजीचे वटमुखत्यारपत्र अभिलेखावर दाखल केले असुन सदरचे वटमुखत्यारपत्र लिहुन घेणार म्हणुन स्वप्नील संपतराव दिंडे व लिहुन देणार म्हणुन संपतराव सिताराम दिंडे यांच्या नांवाची नोंद असुन सदर वटमुखत्यारपत्र

प्रतिवादी यांनी मुळ प्रतित अभिलेखावर दाखल केलेले आहे.

**१३.** मुळात दावा मिळकत ही भोगवटदार वर्ग–२ सदरातील मिळकत असुन वादीच्यापूर्व हक्कदारांच्या नांवाची नोंद पिक पाहणी सदरी व कुळ व खंड सदरी सन १९४८ पासून असल्याचीबाब अभिलेखावर दाखल असलेल्या दस्तांवरुन दिसुन येते. मुळात प्रतिवादींच्या नावाची नोंद ७/१२पत्रकी असल्याने प्रतिवादी हे दावा मिळकतीचे मालक झाले आहेत ही बाब पुराव्याअंती सिध्द होणार आहे. अभिलेखावर असलेले दावा मिळकतींचे ७/१२ उतारे व इतर दस्त यावरुन सदर मिळकत ही सन १९४८ पासून वादींचे पूर्वहक्कदार यांच्याकडे कुळ व खंड म्हणुन आलेले आहे ही बाब प्रथमदर्शनी दस्तांवरुन दिसुन येते. मुळात वादी हे दावा मिळकतीचे कुळ व खंड आहेत ही बाब देखील वादीने पुराव्यासहीत सिध्द करणे अभिप्रत आहे. सध्यस्थितीत वादीने त्यांचा दावा मिळकतीवर १९४८ पासून कब्जा असल्याची बाब सिध्द केली असल्याने मी **प्रश्नबिंदू क्र.१ चे उत्तर होकारार्थी** नोंदवत आहे.

**<u>प्रश्नबिंदू २ व ३ करीता</u> –**

**१४.** वादीने प्रतिवादी विरुध्द प्रथमदर्शनी केस शाबित केलेली आहे. सबब, वादीच्या हक्काना दावा मिळकती संदर्भाने संरक्षीत करणे गरजेचे दिसते. तसे न झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने प्रतिवादींच्या तुलनेत जास्त आहे. सबब, **प्रश्नबिंदू क्रं.२ व ३ होकारार्थी** नोंदवण्यात येत आहे.

**<u>प्रश्नबिंदू ४ करीता</u> –**

**१५.** प्रश्नबिंदू क्रं.१ ते ३ चे उत्तर वादीच्या हक्कात असल्याने प्रश्नबिंदू क्र.४ चे निष्कर्षादाखल खालील आदेश पारित करण्यात येत आहे–

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात आला आहे.

२. दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी असणा–या नावाचे नोंदीआधारे प्रतिवादी यांनी दावा मिळकत त्रयस्थ इसमास विक्री अगर तबदील करु नये, तसेच दावा मिळकतीमध्ये असणारे वादींचे शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी हरकत व अडथळा करु नये तसेच प्रतिवादी यांनी वादीस बेकायदेशीरपणे व अंगबळाचे जोरावर दावा मिळकती मधुन बेदखल करु नये म्हणुन प्रतिवादी विरुध्द दावेचे अंतिम निकालापावेतो तुर्तातुर्त मनाई आदेश पारित करणेत येत आहे.

३. उभय पक्षकारांनी आपापला खर्च सोसावा.

(खुल्या न्यायालयात घोषीत)

Digitally signed by VAISHALI AMOL LAVAND-KOKATE
Date: 2026.02.17 17:38:12 +0530

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

दि.१७.०२.२०२६.
कळे–खेरीवडे.